: प्रकरण 5 वे :

# इचलकरंजीतील कम्युनिस्ट पक्षाचे योगदान

## : प्रकरण पाचवे :

# "इचलकरंजी कम्युनिस्ट पक्षाचे योगदान"

प्रतिनिधीक लोकशाहीच्या विकासाबरोबर राजकीय संस्थाचा विकास होतो. राजकीय पक्ष हे राजकीय संस्थापैकी एक होत. भारताने संसदीय शासनपद्धतीचा स्विकार केला आहे. संसदीय शासन पद्धतीचा प्रयोग विशाल व विस्तृत अशा भारतामध्ये केला गेला आणि तो यशस्वी सुद्धा झाला.

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस हा देशातील शक्तीशाली व प्रभावी राजकीय पक्ष होय. इ. स. 1885 साली राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लोकमत जागृत करण्यासाठी हा पक्ष स्थापन करण्यात आला. "1885 ते 1947 हा कालखंड स्वातंत्र्य चळवळीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र्य झाला."[1]

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महात्मा गांधीजीनी राष्ट्रीय कॉंग्रेस विसर्जित करा असा सल्ला दिला होता. परंतु राष्ट्रीय कॉंग्रेस सत्तेच्या राजकारणात उतरली. पुढील काळात हा राजकीय पक्ष म्हणून कार्य करू लागला. स्वातंत्र्यप्राप्तीचा वैभवशाली वारसा लाभल्यामुळे अनेक वर्षे सत्तारूढ पक्ष म्हणून कार्य करू लागला.

"साम्यवादी विचाराचा प्रभाव भारतामध्ये 1921 पासून झाला. 1917 साली रशियात साम्यवादाचा उदय झाल्यापासून भारतातील कम्युनिस्ट गटावर सरकारचे बारीक लक्ष होते. 1925 साली स्थापन झालेल्या कम्युनिस्ट पक्षाने 1928 पासून कामगार संघटना बांधण्यास सुरूवात केली." [2]

"दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतीय साम्यवादी या महायुद्धाला साम्राज्यवादी संबोधून त्याचा निषेध केला. पण जर्मनीने रशियावर आक्रमण केल्यानंतर ते लोकयुद्ध आहे असा प्रचार सुरू केला. सरकारला या युद्धात मदत करावी असा प्रचार सुरू केला."[3]

साम्यवाद्यांनी भारत स्वतंत्र्य झाल्याबरोबर हिंसक चळवळी सुरू केल्या. त्यामुळे देशातील विविध भागातील पक्ष शाखावर बंदी घातली गेली. 1952 पासून मात्र या साम्यवादी पक्षाने आपल्या धोरणात बदल केला. संसदीय लोकशाही पद्धतीचा मार्ग स्वीकारून तो भारतीय राजकारण उतरला.

साम्यवादी पक्षात चीनच्या आक्रमणाच्या संदर्भात मतभेद निर्माण झाले. यापूर्वीही साम्यवादी पक्षात रशियावादी गट व चीनवादी गट असे भेद चालू होतेच. चीनने भारतावर आक्रमण केले याबाबत साम्यवादी पक्षाने कोणती भूमिका घ्यावयाची या संदर्भात मतभेद विकोपाला गेले आणि त्यातूनच साम्यवादी पक्षाचे विघटन झाले. साम्यवादी पक्षामध्ये झालेल्या मतभेदांच्या अनुषंगाने भारतीय कम्युनिस्ट पक्ष देश पातळीवर दुभंगला. याचा परिणाम म्हणजे राज्य पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत पक्षांच्या विभाजनाची प्रक्रिया सुरू झाली.

1952 ते 1964 या कालखंडात कम्युनिस्ट पक्ष आपले स्थान भारतीय राजकारणात स्थिर करत होता. पण 1964 नंतर वैचारिक संघर्षामुळे ते स्थान टिकविणे शक्य होवू शकले नाही.

"भारतीय राजकारण 1964 च्या फूटीनंतर 1967 च्या लोकसभा निवडणूकीत भाग घेतला. या निवडणूकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला 25 जागा तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाला तेवीस

(23) जागा मिळाल्या."[4]

देशातील डाव्या शक्ती, मा. क. प. व भा. क. प. या पक्षांच्या ताकदीवर काँग्रेसचा पराभव करू शकेल एवढ्या शक्तीशाली नाहीत. तसेच जातीयवादी व धर्मांध शक्तीबरोबर लढा देण्याचे कार्य करावे लागणार आहे. यासाठी भांडवलशाही व जातीयवादी पक्षाविरूद्ध धर्म निरपेक्ष डाव्या पक्षाची तिसरी आघाडी करणे गरजेचे आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्यातील वैचारिक मतभेद व फूटीनंतर वाढलेली स्पर्धा ही नक्कीच पक्षाला काही प्रमाणात मागे खेचण्यात कारणीभुत झाली.

**<u>इचलकरंजीत कम्युनिस्ट पक्षाचे योगदान</u> :-**

आर्थिक शोषण करणाऱ्या वर्गाचे वर्चस्व संपुष्टात यावे. शोषणरहित, वर्गरहित समतेवर आधारलेली, व्यक्ती जीवनाचा सर्वांगीण विकास साधणारी अशी समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी मार्क्सवादी तत्वज्ञान उपयुक्त आहे.

वरील विचार प्रणाली स्विकारून इचलकरंजीमध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना 1952 साली झाली असली तरीही तिच्या कार्याची सुरूवात 1957 पासून झाली. 1952 ते 1957 या काळात पक्ष बांधणी, कार्यकर्ते तयार करणे, मार्क्सवाद -लेनिनवाद कामगारात रूजविणे, कामगारांच्यात वर्गीय जाणीव निर्माण करणे. एवढीच कार्ये कम्युनिस्ट पक्षाने केली.

इचलकरंजी परिसरात कम्युनिस्ट पक्षाने आपले महत्त्व वाढविण्याचा प्रयत्न केला. पण

येथील भाडवंलशाही विचाराने प्रेरित झालेला वर्ग, या पक्षाला विरोध करू लागाला. हा विरोध सनदशीर मार्गाबरोबरच दडपशाही मार्गाने सुरू होता. काँग्रेस हा प्रभावी पक्ष म्हणून इंचलकरंजीच्या राजकारणात होता.

**कम्युनिस्ट पक्षाची तुलना :-**

इचलकरंजीच्या राजकारणात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष 1964 च्या फूटीनंतर स्वतंत्रपणे कार्य करू लागले. या फूटीचा परिणाम इचलकरंजीच्या राजकारणावर झाला.

**पक्षबांधणी :-**

इचलकरंजीमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची सुरूवात 1964 मध्ये झाली. या पक्षामध्ये विभाजनानंतर कॉ. के. एल. मलाबादे, कॉ. एस. पी. पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली पक्ष बांधणीस सुरूवात झाली. पक्ष बांधणी, पक्षाचे कार्यकर्ते, पक्षाची धोरणे इ. बाबत मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षांने यशस्वी वाटचाल केली.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाची 1964 मध्ये स्थापना झाली असली तरी खऱ्या अर्थाने इचलकरंजीत भा. क. प. च्या कार्याला 1982 साली झाली. 1964 ते 1982 या काळात पक्षाने विविध प्रश्न, पक्ष बांधणीसाठी प्रयत्न केले. 1964 च्या फूटीनंतर कॉ. बाळनाथ वरुटे, कॉ. विष्णू सुर्यवंशी, कॉ. अरविंद करनुरे कॉ. रमेश राजीगरे इ. नेते होते. पक्ष बांधणी आणि समाजकार्य कामगार युनियन मार्फत

कामगारांचे प्रश्न सोडविण्यापलीकडे या पक्ष 1982 पर्यंत कार्य केले नाही.

दोन्ही पक्षाची पक्ष बांधणीची कार्यात साम्य आहे. दोन्ही पक्ष एकाच विचार प्रणालीवर संघटीत, आधारलेले आहेत. या पक्षांची वैचारिक भुमिका वेगळी आहे. म्हणजे भारतीय कम्युनिस्ट पक्ष रशियाच्या धोरणानुसार कार्य करतो. तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष चीनच्या धोरणानुसार कार्य करतो. म्हणून दोन्ही पक्षांची विचार प्रणालीबाबत एकमत दिसून येते. फक्त राबविण्याच्या पद्धतीमुळे वैचारिक संघर्ष निर्माण झाला. याचा परिणाम इचलकरंजी पक्ष झाला.

## सामाजिक कार्ये :-

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्षामध्ये सामाजिक कार्ये करण्याबाबत एक वाक्यता आहेत. दोन्ही कम्युनिस्ट पक्षानी इचलकरंजीमध्ये सामाजिक कार्य प्रभावीपणे केले आहे. यात शंका नाही. कारण इचलकरंजी शहर हे औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते. इचलकरंजीत यंत्रमाग व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला. यंत्रमागाच्या वाढीने येथे अनेक सहकारी संस्था, सुतगिरण्या, बँका, पतसंस्था, शिक्षण संस्था, तांत्रिक व औद्योगिक शिक्षण संस्था निर्माण झाल्या. या सर्व संस्थामध्ये काम करणारे सेवक हे इचलकरंजीत राहू लागले. ग्रामीण भागातून आलेला कामगार यामुळे शहराचा विस्तार वाढत गेला. लोकसंख्या वाढत गेली. याबरोबर या व्यवसायाला साह्यभूत असलेले अनेक व्यवसाय वाढले. साहजिकच या सर्वांचा परिणाम नागरी प्रशासनावर झाला. सार्वजनिक आरोग्यावर परिणाम झाला. हे प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासन व्यवस्था कमी पडू लागली. अशा वेळी दोन्ही कम्युनिस्ट पक्षानी नागरी समस्या सुटाव्यात म्हणून प्रयत्न केले. ते प्रश्न पुढील प्रमाणे आहेत.

1. झोपडपट्टी पूनर्वसनचा प्रश्न हा दोन्ही पक्षांना हाती घेतला. यावर सतत संघर्ष केला. झोपडपट्टी पूनर्वसन करताना त्याना नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अन्यथा पूनर्वसन करू नये. अशी भूमिका दोन्ही पक्षानी घेतली.

2. यंत्रमाग कामगारांला, शेतमजूरीला, असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या नोकराला किमान वेतन द्यावे. यासाठी भा. क. प. व मा. क. प. या पक्षानी प्रयत्न केली.

3. इचलकरंजीमध्ये यंत्रमागावर काम करणाऱ्या कामगाराला दिवाळी बोनस मिळावा. यासाठी दोन्ही कम्युनिस्ट पक्ष 10 वर्षापासून कार्य करतात.

4. सर्वसामान्य माणसाला दैनंदिन जीवनात सर्वात त्रस्त करून सोडणारा प्रश्न म्हणजे महागाई. लोकांच्या दृष्टीने दैंनदिन जीवनावश्यक वस्तूचे भाव स्थिर राहावेत. ते वस्तू स्वस्त करणे शक्य नसले तरी महाग होऊ नयेत. याची जबाबदारी शासन व्यवस्थेने घ्यावी याला महत्त्व असते.

जीवनावश्यक वस्तूबाबत आपली लोकसंख्या एवढी वाढत असली तरी आजही स्वयंपूर्ण आहोत असे सरकार सांगत असते. या फसव्या सरकारी धोरणाविरोधी दोन्ही पक्षांनी कार्य केले आहे.

5. शहराचा आरोग्याचा प्रश्न, कामगाराच्या अरोग्याचा प्रश्न याबाबत दोन्ही पक्षानी सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नावर संघर्ष केला आहे. नगरपलिकेला कामगाराच्या सेवा उपलब्ध करून देण्यास भाग पाडले आहे.

6. शहरात निर्माण होणारा शाळा, महाविद्यालयीन प्रवेशाचा प्रश्न आणि त्या संदर्भात घेतलेल्या जाणाऱ्या देणग्या याबाबत मा. क. प व भा. क. प. ने आंदोलन केले आहे. त्याचबरोबर शैक्षणिक कार्य म्हणून लहान बालकासाठी बालवाडी सुरू करण्याचा उपक्रम हा स्त्युत आहे. आज ही भा. क. प. मार्फत एक बालवाडी सुरू आहे. खाजगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षकांवर बडतर्फीची कारवाई करावी यासाठी तहसिल कार्यालयावर मोर्चा नेला.

7. **सामाजिक प्रबोधने** - समाजात अनेक चालीरिती, रिवाज अंधश्रद्धा, जातीयता, अस्पृश्यता, हुंडाबळी या अपप्रवृत्ती आहेत. या अपप्रवृत्ती नष्ट व्हाव्यात यासाठी समाज प्रबोधनाची गरज आहे.

वरील बाबतीत मा. क. प. व भा. क. प. या दोन्ही पक्षानी समाज कार्य व प्रबोधन घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे.

8. **महिला विषयक कार्य -** महिलांच्यावर होणारा अन्याय दूर व्हावा. त्यांना समाजात प्रतिष्ठा मिळावी. सामाजिक समान दर्जा मिळावा. शिक्षणात व नोकरीत समान दर्जा प्राप्त व्हावा. स्त्रियांची उन्नती आणि उष्कर्ष व्हावा. अन्याय, जूलूम, बलात्कार, दूर व्हावा यासाठी वेळोवेळी संघर्ष केला आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या जनवादी महिला संघटनेद्वारे अशा प्रकारचे प्रयत्न केले आहेत. तसेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या भारतीय महिला फेडरेशनने इचलकरंजीत वरील प्रश्नासाठी संघर्ष केला आहे.

9. **जनजागृती-** कामगार वर्गाला त्याच्या हक्काविषयी जागृत करण्याचे काम, बेकारी व बेरोजगारी आणि कामगारांचे राहणीमान सुधारावे यासाठी प्रयत्न दोन्ही कम्युनिस्ट पक्षांनी केला आहे.

इचलकरंजीमध्ये ज्या ज्वलंत सामाजिक समस्या प्रश्न आहेत ते प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने मोर्चे, आंदोलने पर्यायी अटक करून घेणे. अशा मार्गाचा वापर दोन्ही कम्युनिस्ट पक्षानी केला आहे.

**कम्युनिस्ट पक्षाची राजकीय कार्याबाबत तुलना :-**

इचलकंरजीच्या राजकीय कार्याबाबत दोन्ही कम्युनिस्ट पक्षांत तुलना केली असता मा. क. प. ने आपले स्थान निश्चित प्रभावी केले आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांने इचलकरंजीच्या स्थानिक नगरपालिकेच्या राजकारणात 1962 पासून उमेदवार उभे करण्यास सुरूवात केली. 1985 साली मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे 6 नगरसेवक निवडून आले आणि दोन सहानुभूतीदार नगरसेवक निवडून आले. त्यावेळी आघाडीची मदत घेवून पक्षाला नगराध्यक्ष पद मिळाले.

कॉ. के. एल. मलाबादे नगराध्यक्ष झाले. त्याच्या नगराध्यक्षाच्या कारकिर्दीत त्यानी अनेक विकास कामे केली. त्यामुळे इचलकरंजीत प्रभावी लोकमत निर्माण करता आले.

त्याच बरोबर भारतीय कम्युनिस्ट पक्षांने 1974 पासून इचलकरंजी नगरपालिकेच्या निवडणूका लढविण्यास सुरूवात केली. पण मा. क. प. ला म्हणावे तसे यश प्राप्त होऊ शकले नाही.

**2. <u>विधानसभा निवडणूक व लोकसभा निवडणूक</u> :-**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने विधानसभा निवडणूका 1967 पासून लढविण्यास सुरूवात केली. 1978 व 1990 या दोन विधान सभा निवडणूकामध्ये मा. क. प. चे उमेदवार इचलकरंजी मतदार संघातून विजयी झाले आहेत. तसेच लोकसभा निवडणूका 1996 पासून लढविण्यास सुरूवात केली. पण या निवडणूकीत मा. क. प. ला यश आले नाही. कारण हा पक्ष इचलकरंजी शहरापुरता मर्यादित आहे. त्याचा विस्तार खेड्यापर्यंत झाला नाही.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाने विधानसभा व लोकसभा निवडणूका लढविण्याचा प्रयत्न केला नाही. भा. क. प. हा शिरोळ, हातकणंगले भागात विस्तारत आहे. पण पक्षाला अनुभवी नेतृत्त्व लाभू शकले नाही.

**3. <u>साह्यकारी संघटनाबाबत दोन्ही पक्षाची तुलना</u> :-**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने ट्रेड युनियनच्या माध्यमातून कामगाराचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिने प्रयत्न सुरू केले. कामगारांचे आर्थिक व सामाजिक हक्क मिळविणे त्याचे रक्षण करणे हा हेतु आहे. इचलकरंजीत अनेक कामगार अनेक व्यवसायात असंघटित आहेत. त्याना ट्रेड युनियनच्या माध्यमातून संघटित करून त्यांचे हक्क व अधिकार सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला गेला.

अशाप्रकारे प्रयत्न इचलकरंजीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाने प्रयत्न केले आहेत. युनियनच्या मार्फत गाव चावडीवर मोर्च काढले आहेत आणि कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला

आहे.

मा. क. प. ची डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया ही संघटना युवकांच्यामध्ये जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न करते. या संघटनेने सामाजिक कार्ये, महागाईबाबत निषेध, जातीय सलोखा, महिला वर्गासाठी कार्य व युवक व बेरोजगारासाठी कार्ये केलेली आहेत.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाची अशा प्रकारे संघटना अस्तित्वात असली तरी युवकांच्यासाठी प्रभावी कार्य करताना दिसून येत नाही.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनेने इचलकरंजीमध्ये विद्यार्थी वर्गासाठी अनेक उपक्रम राबविण्याचा प्रयत्न केला आहे. इचलकरंजीच्या स्थानिक पातळीवर एस् . एफ. आय ने अनेक कामे केली आहेत. महाराष्ट्र शासनाने EBC बंद करण्याचा निर्णय घेतला तेव्हा शिक्षणमंत्र्याला घेराव घातला आणि EBC बंद करण्याचा आदेशाला स्थगिती मिळाली.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाची अशा प्रकारची संघटना अस्तित्त्वात आहे. पण त्या संघटनाचे कार्य सध्या प्राथमिक अवस्थेत आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षासारखे भा. क. प. च्या विद्यार्थी संघटनेचे संघटन व कार्य सुरू झाले नाही.

अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेचे कार्य मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्त्वाखाली सुरू आहे. स्त्रिया वरील अन्याय, अत्याचार, दूर करण्याचा प्रयत्न या संघटनेने केला आहे.

त्याचप्रमाणे भारतीय महिला फेडरेशन या संघटनेद्वारे स्त्रियांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केला आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाने इचलकरंजीबरोबर शिरोळ, हातकणंगले तालुक्यामध्ये विस्तार सुरू केला आहे. ग्रामपंचायत कामगार संघटना, दूध सोसायटी व क्रेडिट सोसायटी संघटना स्थापन केल्या आहेत. ग्रामपंचायत कामगार संघटनेने त्याच्या नोकरीबाबत सेवा सवलती, पगार, किमान वेतन मिळवून देण्याचा प्रयत्न भा. क. प. च्या साह्यकारी संघटनेने केला आहे. त्याचबरोबर अंगणवाडी, बालवाडी संघटना स्थापन करून त्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडले आहेत.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने मात्र याबाबत कार्य केले नाही. ग्रामीण भागात संघटना स्थापून पक्षाच्या विस्तार केला गेला नाही. इचलकरंजी शहरापुरता मा. क. प. पक्ष कार्य करताना दिसतो.

अशाप्रकारे इचलकरंजीच्या राजकारणात भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या दोन्ही पक्षानी सामाजिक व कामगार प्रश्नाबाबत प्रभावी भूमिका घेतली आहे. यंत्रमाग कामगारांच्या वेतनाचा प्रश्न, मजूरी वाढीचा प्रश्न, यंत्रमाग कामगार दिवाळीसाठी बोनसचा प्रश्न, झोपडपट्‌टी महागाईचा प्रश्न, शहराच्या आरोग्याचा प्रश्न, शैक्षणिक कार्य, सामाजिक प्रबोधन, महिला विषयक कार्य, जनजागृती कामगारांचे राहणीमानाचा प्रश्न याबाबत दोन्ही कम्युनिस्ट पक्षांनी प्रभावीपणे कार्य केले आहे.

**इचलकरंजीमध्ये मा. क. प. व भा. क. प. एकत्रिकरणची आवश्यकता :-**

इचलकरंजीमध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना 1952 मध्ये सुरू झाली असली तरी 1957 पासून या पक्षांच्या कार्याला सुरूवात झाली. 1964 च्या फूटीनंतर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांनी स्वतंत्रपणे कार्याला सुरूवात केली.

इचलकरंजीमध्ये या दोन्ही पक्षानी सामाजिक क्षेत्रात प्रभावीपणे कार्य केले आहे. इचलकरंजीच्या राजकारणात दोन्ही पक्षामध्ये निवडणूकीत मतविभागणी झाल्यामुळे कॉंग्रेस व इतर पक्षांना याबाबत बहुमत मिळत गेले. कॉंग्रेसची सत्ता इचलकरंजी नगरपालिकेवर कायम राहिली.

दोन्ही पक्षाचे राजकीय धोरण राष्ट्रीय, राज्य पातळीवर जसे ठरते त्याप्रमाणे स्थानिक पातळीवर ते धोरण राबविले जाते. स्थानिक व राज्यपातळीवरील धोरण यात तफावत दिसून येत नाही.

काही पक्ष स्थानिक पातळीवर कोणत्याही पक्षाशी तडजोड घडवून आणून स्थानिक सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करतात. पण हे दोन्ही पक्ष वैचारिक मतभेदामुळे इचलकरंजीच्या स्थानिक राजकारणात एकत्र येवू शकत नाहीत.

**दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरण बाबतची आवश्यकता :-**

इचलकरंजीमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष एकत्र येवून इचलकरंजीचे राजकीय चित्र पालटू शकेल. या दोन्ही पक्षाच्या एकत्रीकरणामुळे भांडवलशाही विचार प्रणालीचे पक्ष व जातीयवादी पक्ष यांना दूर ठेवता येवू शकेल. म्हणून भा. क. प. व मा. क. प. या दोन

पक्षाची विचारप्रणाली एकच आहे. पण वैचारिक मतभेदांमुळे ते एकत्र येवू शकत नाहीत.

अशा परिस्थितीत मार्क्सवादावर अढळ विश्वास ठेवून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत समाजसत्तावाद प्रस्थापनेचा लढा दोन्ही कम्युनिस्ट पक्षांनी केला आहे.

इचलकरंजी नगरपालिका निवडणूकीसाठी एक तिसरी शक्ती तिची बांधणी करणे अपरिहार्य होते. अशा परिस्थितीत या दोन्ही गटांनी पूर्वग्रह बाजूला ठेवून राजकीय समान भूमिकेवर आपल्या ताकदीचा अवास्तव अंदाज करणे सोडून ऐक्य साधणे महत्त्वाचे आहे.

काँग्रेस व शिवसेना विरोधी एकच आघाडी उभी करणे गरजेचे आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ध्येयधोरणाने वाहिलेल्या, जनतेचे प्रश्न सोडविणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच निर्माण करतो.

इचलकरंजी शहरामध्ये या दोन्ही पक्षाचे योगदान पाहत असताना त्या पक्षांनी केलेली विविध कार्ये कशा प्रकारे पार पाडली आहेत, ते पाहणे महत्त्वाचे आहे. या पक्षांनी सामाजिक कार्याबरोबर राजकीय कार्ये प्रभावीपणे केली आहेत. इचलकरंजीमध्ये जातीय शक्ती व भाडंवलशाही व्यवस्थेविरुद्ध लढावयाचे असेल तर दोन्ही पक्षांनी वैचारिक मतभेद बाजूला ठेवून समान कार्यक्रमावर एकत्र येणे आवश्यक आहे. यामुळे इचलकरंजीत राजकारण बदल होऊ शकेल आणि पक्षाला अपेक्षित असलेली समाजसत्तावादी सत्ता प्रस्थापित करता येईल.

## : संदर्भ :

1. शिरीष सहस्त्रबुद्धे , बखर काँग्रेसची ऋ राजहंस प्रकाशन पुणे, पा. नं. 315

2. डॉ. भोळे भा. ल. , भारतीय संविधान सिद्धांत आणि व्यवहार, महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ , पा. नं. 220

3. डॉ. भोळे भा. ल. , भारतीय संविधान सिद्धांत आणि व्यवहार, महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ, पा. नं. 220

4. श्री. पाटील बी. बी, भारतीय शासन व राजकारण , फडके प्रकाशन कोल्हापूर, पा. नं. 211

****